# परभणी शहर महानगरपालिका, कार्यालय परभणी येथे कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात पदे भरणेबाबत.

## जाहिरात

परभणी शहर महानगरपालिका DAY-NULM अंतर्गत रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने पदभरती करणेसाठी पदांची संख्या,पदांची पात्रता व मानधन यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | अपेक्षित पदांची पात्रता | पद संख्या | अपेक्षित मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१. | समुदाय संघटक | एच.एस.सी.पास व कोणत्याही सामाजिक संस्थेतील किंवा शासकीय वा निमशासकीय कार्यालयातील किमान ०५ वर्षांचा अनुभव आवश्यक.तसेच एम.एस.सी.आय.टी./एम.एस.ऑफीस व तत्सम संगणक पात्रता प्रमाणपत्र. | ०२ | १५,००० /- रु. |

| कार्यवाहीचा तपशिल | दिनांक |
|---|---|
| जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या पदांचे अर्ज स्विकारणे | **दि.१२/०२/२०१८ ते दि.२८/०२/२०१८ वेळ-सकाळी ११.०० ते सायं.५.०० वा.पर्यंत (सुटीचे दिवस वगळुन)** |
| जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या पदांच्या प्राप्त अर्जांची छाननी व पात्र/अपात्र यादी प्रसिध्द करणे | **दि.०५/०३/२०१८.** |
| लेखी परिक्षा | **दि.११/०३/२०१८ वार-रविवार वेळ सकाळी. ११.०० वाजता** |

**परभणी शहर महानगरपालिका अंतर्गत DAY-NULM अंतर्गत रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने पदभरती बाबत.**

## अटी व शर्ती

१. अर्जाचा नमुना,तोंडी मुलाखत व निकालासंबंधी दिनांक निहाय कार्यक्रम पत्रिका या कार्यालयाची वेबसाईट www.pcmcparbhani@gov.in वर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

२. उमेदवारांची किमान वयोमर्यादा **१८ ते ४५ वर्ष**/सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत काम केलेल्या उमेदवारांसाठी ५ वर्ष शिथीलक्षम.

३. अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेच्या व अनुभवाच्या सत्यप्रती साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे.व प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळी मुळ प्रती तपासणीसाठी उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

४. सदरची नेमणुक ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असुन सुरुवातीस ११ महिन्यांच्या कालावधीपर्यंत नियुक्ती राहील.त्यामुळे सेवा नियमित करण्याची कोणतीही मागणी करता येणार नाही किंवा ते अनुज्ञेय राहणार नाही.

५. निवड झालेल्या उमेदवारांस रु.१००/- च्या बाँडवर सेवेबाबत करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.

६. नियुक्त उमेदवारांकडुन आर्थिक किंवा इतर नुकसान झाल्यास ते संबंधिताकडुन वसुल करण्यात येईल.व गुन्हयाचे स्वरुप पाहुन वेळेनुसार नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

७. नियुक्त उमेदवारांस पुर्णवेळ काम करणे बंधनकारक आहे,काम करतांना कुठल्याही प्रकारची अनपेक्षित घटना/अपघात इ.कारणामुळे शारिरीक इजा झाल्यास त्यास तो स्वता जबाबदार राहील.त्याबाबत कोणतीही नुकसान भरपाई दिली जाणार नाही.किंवा हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

८. नियुक्त उमेदवारांस स्वताचे इच्छेनुसार सेवामुक्त/राजीनामा दयावयाचा असल्यास त्यांनी ०१ महिना अगोदर या कार्यालयास कळविणे बंधनकारक आहे.अशी नोटीस न दिल्यास व सेवा सोडुन गेल्यास एक महिन्याचे मानधन वसुल करण्यात येईल.परंतु संबंधितांना कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता काढुन टाकण्याचा किंवा सेवा कालावधी कमी करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील.

**९.अर्ज करण्याचा अंतिम दिनांक २८/०२/२०१८ असुन जाहिरातीपुर्वी व मुलाखतीनंतर प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही.**

१०. सोबत दिलेल्या नमुन्यामध्ये अर्ज **A-4** साईजवर संगणकीकृत करुन सादर करावा व अर्जावर स्वताचा सदयकाळातला फोटो लावावा.

११. प्राप्त अर्जांची छाननी करुन पात्र उमेदवारांस तोंडी मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.अपात्र ठरलेल्या उमेदवारांस कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.किंवा कारण कळविले जाणार नाही किंवा सबब ऐकुण घेतली जाणार नाही.

१२.जर मोठया प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्यास वेळ प्रसंगी लेखी परिक्षा,पदांनुसार संगणकीय परिक्षा व मुलाखत घेतली जाईल.याबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरितांकडे आहे.

१३. उपरोक्त मानधना व्यतिरीक्त इतर कोणतेही भत्ते,सवलती अनुज्ञेय असणार नाहीत.

**१४. अर्जासोबत राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान,परभणी शहर महानगरपालिका परभणी यांचे नावे रु.१५०/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष/डी.डी. नापरतावा म्हणुन जोडणे बंधनकारक आहे.**

१५. उमेदवारांचे कार्यक्षेत्र हे परभणी शहर महानगरपालिका परभणी अंतर्गत देण्यात येणा-या परीसरातील असेल.शहरातील ज्या परीसरात काम दिलेले आहे त्या परीसरामध्ये काम करणे बंधनकारक राहील.

१६. तोंडी मुलाखतीच्या तारखेस येतेवेळेस आपले मुळ कागदपत्रांसह ०१ तास आगोदर मिटींग हॉल,परभणी शहर महानगरपालिका येथे उपस्थित रहावे.

सदरील पदभरतीशी संबंधित सर्व कार्यवाही या कार्यालयाची वेबसाईट www.pcmcparbhani@gov.in वर अदयावत करण्यात येईल,उमेदवारास यासंबंधी कसल्याही प्रकारचा स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. तसेच या पदभरतीशी संबंधित सर्व प्रकारचे निर्णय घेण्याचा अधिकार मा.आयुक्त परभणी शहर महानगरपालिका परभणी यांना राहतील.

उप **आयुक्त**
**परभणी शहर महानगरपालिका करिता**

# अर्जाचा नमुना

फोटो

प्रति,
मा.आयुक्त साहेब,
परभणी शहर महानगरपालिका,
परभणी

परभणी शहर महानगरपालिका,परभणी अंतर्गत समुदाय संघटक या पदासाठीचा अर्ज

01. उमेदवारांचे संपूर्ण नाव :-........................................................................................
(आडनाव प्रथम लिहावे)

02. पत्र व्यवहाराचा संपूर्ण पत्ता :- ........................................................................................

03. भ्रमणध्वनी / दुरध्वनी क्रमांक :- ........................................................................................

04. ई-मेल आयडी :- ........................................................................................

05. जन्म तारीख(शालांत टी.सी.नुसार) :- वय वर्षे........................................................................................

06 शैक्षणिक पात्रता

| अ.क्र | परिक्षेचे नांव | उत्तीर्ण वर्ष | मंडळ/ विद्यापीठाचे नाव | प्राप्त टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 01 | | | | |
| 02 | | | | |
| 03 | | | | |
| 04 | | | | |
| 05 | | | | |

अनुभवाचा तपशिल

| अ.क्र | संस्था कार्यालयाचे नाव | पदनाम | वेतनश्रेणी / मानधन | कालावधी |
|---|---|---|---|---|
| 01 | | | | |
| 02 | | | | |
| 03 | | | | |
| 04 | | | | |
| 05 | | | | |

टिप :- अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी साक्षांकित प्रत :-

07. अर्जासोबत सादर केलेल्या प्रती

01.
02.
03.
04.
05.

मी खालील सही करणार प्रमाणित करतो की, उपरोक्त माहिती ही खरी असूनती चुकीची आढळून आल्यास मी कायदेशिर कार्यवाहीस पात्र ठरले.माझा अर्ज अवैद्य ठरल्यास मी कोणतेही तक्रार करणार नाही अथवा न्यायालयाचा मार्ग अवलंबणार नाही.

(उमेदवारांचे सही)